# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ४६ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : १०/०५/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.१०/०५/२०२१ सोमवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती पाटील राजेंद्र झिपरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त. खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. पाटील राजेंद्र झिपरू सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | बाविस्कर किशोर रमेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | काळे अमित पांडुरंग |
| देशमुख प्रतिभा गजानन | पाटील कुलभुषण विरभान |
| काळे रेश्मा कुंदन | लढढा नितीन बालमुकुंद |
| चव्हाण ज्योती बाळासाहेब | बरडे नितीन मनोहर |
| बेंडाळे उज्वला मोहन | नाईक प्रशांत सुरेश |
| नेरकर सरिता अनंत | शेख सैईदा युसुफ |
| कोल्हे ललीत विजय | |

सदर सभेस मा.आयुक्त. श्री.सतिश कुलकर्णी, अतिरिक्त आयुक्त.डॉ.विद्या गायकवाड, नगरसचिव .श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त .श्री.प्रशांत पाटील,उपायुक्त.श्री. शाम गोसावी, मुख्यलेखा परिक्षक. श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी. श्री.कपिल पवार ,सहा.आयुक्त.श्री.आकाश डोईफोडे व सहा.आयुक्त. श्री.पवन पाटील उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**मा.सभापती :-** सभेच्या कामकाजास सुरूवात करावी.

**मा.नगरसचिव :-** विषय पत्रिकेवरील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.२५/०२/२०२१ रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती, दि.२५/०२/२०२१ रोजी सकाळी ११.३० संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे तसेच दि.३१/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता तहकुब स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** इतिवृत्त कायम करण्यात यावे.हॅलो आवाज येतोय का?

**मा.नगरसचिव :-** येतोय मॅडम येतोय

**मा.सभापती :-** येतोय ताई आवाज येतोय

**सौ.उज्वला बेंडाळे :-** इतिवृत्त कायम करण्यात यावे.

**मा.सभापती :-** अमितभाऊ काळे.

**श्री.अमित काळे :-** मंजुरी आहे, माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.२५/०२/२०२१ रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती, दि.२५/०२/२०२१ रोजी सकाळी ११.३० संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे तसेच दि.३१/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता तहकुब स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- काळे अमित पांडुरंग**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२१ करीता श्री.महेंद्र दत्तात्रय पवार यांची कंत्राटी तत्वावर सिटी कॉर्डीनेटर म्हणून जळगांव शहर महानगरपालिकेत अटी-शर्तीस बंधनकारक राहुन करारतत्वावर ६ महिने करीता तात्पुरती नियुक्ती करणे व याकामी येणारा एकुण रक्कम रु.२,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय, मला या विषयाच्या संबंधी बोलायचे आहे.

**मा.सभापती :-** बोला भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** या विषयास अनुसरून मी तुम्हास सुचित करीत आहे.या जे कोऑर्डीनेटर आहेत त्यांना आपल्याला २ लाख पगार वार्षिक मुदतवाढीचा आहे तो शासनाकडून येणार आहे का?

**मा.सभापती :-** पाटील साहेब

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** सन्मा.सभागृह सिटी कोऑर्डीनेटर श्री.महेंद्र पवार यांची नेमणूक शासनाकडून दि.१५/१०/२०२० पासुन झाली होती . स्वच्छ सर्वेक्षण २०२१ ची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत १५ एप्रिल पर्यंत पुर्ण झालेली आहे.यासाठी शासनाची नेमणूक असतांना याच्या पगारासाठीचा जो खर्च होता तो १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन अनुज्ञेय होता . तसेच शासनाच्या आदेशात तसे नमुद होते. आता आपल्याला त्यांना जर मुदतवाढ द्यायची असणार तर आपल्याला हा खर्च मनपा फंडातुन करावा लागणार आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तर आमची सुचना आहे की शासनाची जोपर्यंत मान्यता भेटत नाही तोपर्यंत १४ व्या वित्त आयोगाचा निधी येईपावेतो हा विषय घेण्यात येवु नये तरी हा विषय स्थगीत ठेवण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** यामुळे मनपा निधीवर बोझा पडेल हॅलो हॅलो मा. आयुक्त महोदय आता नवनाथ भाऊंनी मांडलेली सुचना जी आहे ती अत्यंत योग्य आहे की ३५ हजार रूपये महिना हा खर्च महानगरपलिकेवर पडणारा बोझा आहे. तरी त्यांच्या पगारावर होणारा खर्च जोपर्यंत राज्य शासन परिपुर्ती करून देत नाही तोपर्यंत या प्रस्तावाला मान्यता देवु नये.

**मा.सभापती :-** भाऊ आपण शासनाला प्रस्ताव पाठवु

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी

**मा.सभापती :-** मान्यता आली तर आपण यांना कन्टीन्यु करू

**श्री.नितीन लढ्ढा :-** होय शासनाकडुन मान्यता आली तरच कन्टीन्यु करायचं

**मा.सभापती :-** ठिक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी

**नगरसचिव :-** तहकुब करायचा हा विषय मग

**सौ.ज्योती चव्हाण :-** तहकुब करा

**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब करून घ्या

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तहकुब करा

**नगरसचिव :-** आदरणीय भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी

**नगरसचिव :-** जर शासनाची मान्यता आल्यानंतर आपल्याला कन्टीन्यु करायच आहे तर मग तहकुब कसा काय करता येईल हा विषय

**श्री.नितीन लढ्ढा :-** तो पर्यंत यांना डिस्कंटीन्यु करा.

**मा.आयुक्त :-** मा.सभापती महोदय आपल्याला त्याच्यामध्ये एक करता येईल की आत्ता आपण मनपा निधीमधुन प्रस्ताव ठेवलेला आहे त्याऐवजी आपण शासनाकडे मंजुरीला प्रस्ताव पाठवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी

**मा.आयुक्त :-** आपण तेवढे दिवस म्हणजे शासनाची आपल्याला ६ महिने मंजुरी मिळालेली होती. त्याच्यानंतर त्यांचे जे काही एक दिड महिना काम झाले असेल. तेवढयाला आपण मनपा निधीमधुन मंजुरी द्यावी. आता आपण म्हणता आहे त्याप्रमाणे त्यांना डिस्कंटीन्यु करावं आणि शासनाकडे प्रस्ताव पाठवुया. जर शासनाने पुढच्या कालावधी साठी मंजुरी दिली तर शासनाची मंजुरी झाल्यानंतर आपल्याला पुन्हा पुढच्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या मंजुरीने नेमणुक करता येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे.

**मा.आयुक्त :-** माझ्या मते हा निर्णय घेणं जास्त ठिक राहील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे काही अडचण नाही आपण जे म्हणताहेत त्या पध्दतीने यांच मागील थकीत पगार जे आहे ते अदा करण्यात यावं. जोपर्यंत पुढची शासनाची मान्यता येत नाही तोपर्यंत यांना नविन नियुक्ती देण्यात येवु नये

**मा.सभापती :-** आजच्या तारखेपर्यंतचा त्यांना पगार द्यायचा आणि डिस्कंटीन्यु करायचं आणि मग त्यानंतर आपला प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर मग त्यांचा विचार करण्यात येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे राजुभाऊ

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२१ करीता श्री.महेंद्र दत्तात्रय पवार यांची कंत्राटी तत्वावर शहर समन्वयक (सिटी कॉर्डीनेटर) या पदावर मा.प्रादेशिक उपसंचालक, (नपप्र) विभागीय आयुक्त यांचे कार्यालय नाशिकरोड, नाशिक पत्र क्रं.नपप्रंस/ स्वच्छ महा./कावि/जा.क्र./९१०/२०२० दि.०९/१०/२०२० नुसार नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच निवड झालेल्या उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची तपासणी करुन आयुक्त यांनी नियुक्ती पत्र निर्गमीत करावे. असा उल्लेख केलेला आहे.

राज्य अभियान संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रं./राअस/सि.सि./१५५/२०-२१ दि.०८/१०/२०२० तसेच नाशिक विभागीय आयुक्त कार्यालय यांचेकडील पत्र क्रं.डीआरडीएमए/एनएसके-सीसी/१७३/२०२० दि.१०/०९/२०२० नुसार शहर समन्वयक (सिटी को-ऑडिनेटर) या पदासाठी नियुक्ती पत्राचा मसूदा पत्रासमवेत देण्यात आलेला असून आवश्यकतेप्रमाणे त्यात अतिरिक्त बाबींचा समावेश करावा. कामाची निकड पाहता उमेदवारांच्या नियुक्तीचा दिनांक निश्चित करावा व आयुक्तांनी प्रत्यक्ष मुळ कागदपत्रांची तपासणी करुन नियुक्ती आदेश निर्गमीत करावे. सदर उमेदवारांचे पारिश्रमिक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे उपलब्ध १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत निधीतून अदा करावे असे निर्देश दिलेले आहे.

जळगांव शहर महानगरपालिका जा.क्र./४५४/२०२०-२१ दि.१५/१०/२०२० नुसार श्री.महेंद्र दत्तात्रय पवार यांची शहर समन्वयक (सिटी को-ऑडिनेटर) या पदावर नियुक्तीचे आदेश निर्गमीत करण्यात आलेले होते. सदर आदेशात स्वच्छ सर्वेक्षण-२०२१ ची कार्यवाही पुर्ण होई पर्यंत राहील व शहराचे स्वच्छ सर्वेक्षण पूर्ण होताच नियुक्ती संपुष्टात येईल असे नमुद आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२१ करीता ६ महिन्याचा कालावधी अपेक्षीत असल्याने त्यासाठी १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत निधीतून वेतन अदा करणेस मान्यता घेण्यात आलेली होती. सदरची मुदत दि.१४/०४/२०२१ रोजी संपुष्टात येणार आहे.

परंतू श्री.महेंद्र दत्तात्रय पवार यांची शहर समन्वयक (सिटी को-ऑडिनेटर) यांचे वेतनावरील खर्च हा १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत निधीतून करण्यात येत असल्याने श्री.महेंद्र दत्तात्रय पवार यांची शहर समन्वयक (सिटी को-ऑडिनेटर) म्हणून नियुक्ती करणेसाठी राज्य शासनाकडे परवानगी घेणे कामी प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्तावास जोपर्यंत राज्य शासनाची परवानगी प्राप्त होत नाही तोपर्यंत त्यांना नियुक्ती देण्यात येवु नये त्यांचे नियुक्तीच्या प्रस्तावास राज्य शासनाची परवानगी प्राप्त झालेवर त्यानूसार फेरप्रस्ताव स्थायी समिती सभेपूढे सादर करावा. तोपर्यंत त्यांना नियुक्ती देण्यात येवु नये तसेच श्री.महेंद्र दत्तात्रय पवार, शहर समन्वयक (सिटी को-ऑडिनेटर) यांनी दरम्यानच्या काळात आजपावेतो जे एक-दिड महिना काम केलेले असेल त्याकामाचे वेतन हे मनपा फंडातून अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**नगरसचिव :- विषय क्र. ३ :-** जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ मधील थकबाकीदार मिळकतधारकांकडील नळ संयोजन बंद करण्यासाठी २४ मजूर प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ साठी (प्रत्येकी ०६ मजूर) मक्तेदारामार्फत पुरविणे कामी रक्कम रु.५४५/- प्रती मजूर प्रतीदिवस याप्रमाणे २६ दिवसांसाठी येणारा एकूण रक्कम रु.३,४०,०८०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय,

**सौ.उज्वला बेंडाळे :-** अध्यक्ष महोदय, मला बोलायचे आहे या विषयावर

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय, सुचीत करायचे आहे, बोलायचे आहे.

**मा.सभापती :-** बोला नवनाथ भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय असा आहे की,३ नंबरच्या विषयामध्ये नळ संयोजन घरपट्टी च्या संदर्भात आपण बंद करतोय बरोबर तर तुम्ही ते सहा महिन्यांसाठी नळ पट्टी असो की आरोग्याच्या संदर्भात कोणते विषय असो आता कोविड-१९ चालु आहे. आता हे किती दिवस चालत काय चालतं हे सांगता येत नाही. पण आपल्याला कर्मचाऱ्यांचा अभाव आहे. कर्मचारी नसल्यामुळे आरोग्य , अतिक्रमण , पाणी पुरवठा या विभागाला जे जे मजुर लागतील. त्यांना सहा महिन्यांसाठी मजुर पुरवण्याचं एकच ठेका काढण्यात यावा आणि वेळोवेळी मिटींग ला असे प्रस्ताव घेऊ नये यामुळे वेळ वाया जातो त्याकरीता हे आपण लक्षात घेवुन या तिन विभागांकरीता असे टेंडर काढावे किंवा मंजुर दरात जे ठेकेदार असतील . त्यासाठी आरोग्य असो, पाणीपुरवठा असो की अतिक्रमण असो ते सहा महिन्यासाठी माझ्या सुचनेनुसार अशी मान्यता मिळावी असे मी सुचित करीत आहे.काय आहे त्यामुळे वेळ वाया जातो आपला कसे आहे रिपोर्ट घेणे समिती पुढे ठेवणे वेळ जातो तेवढा टाईम नाहीये आपल्याला कोविडच्या धर्तीवर बरेच कामं पडलेले आहेत आपले

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,मला बोलायचं आहे, सभापती महोदय

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** राजुभाऊ उत्तर द्या

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,मला बोलायचं आहे,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आयुक्त साहेब उत्तर द्या

**श्री.नितीन लढ्ढा :-** उज्वला ताईंना चर्चा करून घेवु द्या.

**मा.सभापती :-** बोला ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय, हे जे मजुर पुरविण्याचा हा विषय आहे. हे काम झालेलं आहे की करायचं आहे आता

**मा.सभापती :-** पाटील साहेब कोणाकडे आहे इकडे या

**श्री.उदय पाटील, प्रभाग अधिकारी,प्र.स.क्रं.४ :-** आदरणीय सभागृह या संदर्भातील ठराव मंजुर झालेला आहे आणि आतापर्यंत फक्त प्रभाग समिती १ व दोन मध्ये काही मजुर या कामासाठी लावले होते आणि त्याचे १३९८०/- रूपयांच देयक आत्ता पर्यंत आलेले आहे आणि काही मजुर आपण प्रत्यक्षात काही ठिकाणी लावलेले नाहीत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** जर प्रत्यक्षात काही ठिकाणी मजुर लावलेले नाहीत तर मग हा प्रभाग समिती १ ते ४ चा हा प्रस्ताव आला कसा ? जे कामं केलेले आहेत प्रभाग समिती १ व २ मध्ये तोच प्रस्ताव ठेवायला पाहीजे होता . प्र.स.क्रं. १ ते ४ चा का ठेवण्यात आला.

**श्री.उदय पाटील, प्रभाग अधिकारी,प्र.स.क्रं.४ :-** भविष्यात जर लागले तर प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** भविष्यात आता हे कसे दिलेले आहे ३४००८०/- रूपये.

**श्री.उदय पाटील, प्रभाग अधिकारी,प्र.स.क्रं.४ :-** ती अंदाजपत्रकीय रक्कम आहे. प्रभाग समिती १,२,३ व ४ मिळुन २६ दिवसांसाठी मजुर लावण्यासाठी हा एकूण अंदाजपत्रकीय खर्च आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** बर मग बिल निघालय का त्या दोन प्रभाग समित्यांच

**श्री.उदय पाटील, प्रभाग अधिकारी,प्र.स.क्रं.४ :-** नाही नाही

**सौ.उज्वला बेंडाळे :-** म्हणजे बिल बाकी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अजुन त्या खर्चाला मान्यता देण्यासाठी हा प्रस्ताव आलेला आहे ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो ना भाऊ मला काय म्हणायचं आहे ते म्हंटल आहे की १ ते २ साठी झालेला आहे. आम्हाला अशी माहिती देण्यात आलेली आहे की प्रभाग समित्यांचे १ ते ४ चे काम झालेले आहे आणि १५ च मजुरांनी कामं केलेलं आहे.

**मा.सभापती :-** ताई पाटील साहेबांनी माहिती दिली की काम ऑलरेडी झालेलं आहे. तुम्ही जे विचाराता आहेत ते पण योग्य आहे.आपल्याकडे काम झाल्यानंतर हा प्रस्ताव मंजुरीसाठी येतोय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव हा कार्योत्तर मंजुरीसाठी येतोय

**मा.सभापती :-** होय, हे काम झालेलं आहे ताई जे विचारता आहेत ते पण योग्य आहे. आपण आता ती माहिती घेतली काही प्र.स.क्रं. १ आणि २ ची समिती त्याच्यामध्ये मजुर पुरवले गेलेले आहे आणि ३ व ४ मध्ये काम झ ाालेले नाही आणि ते काम झाल्यानंतर आपल्याकडे मंजुरीसाठी आलेले आहे.

**श्रीमती. सरीता नेरकर :-** सभापती साहेब मला बोलायचे आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** याच्यावर उत्तर पाहीजे मला साहेब उत्तर काय आहे म्हणजे हे असे ठराव येतात पुर्ण माहिती नसते . जर १ व २ चे आहे तर पुर्ण द्यायचे नाही ना दोनचं द्यायला पाहीजे होतं असे माझे म्हणणे आहे.

**श्रीमती. सरीता नेरकर :-** सभापती साहेब मला बोलायचे आहे.

**मा.सभापती :-** ताई बोला

**सौ.उज्वला बेंडाळे :-** २६ मजुर सांगतात आणि ५० लोक काम करता आहेत.

**मा.सभापती :-** नेरकर ताई बोला

**श्रीमती. सरीता नेरकर :-** शिव कॉलनीमध्ये माझा स्वत:चा वैयक्तीक फ्लॅट आहे . तिथे मी माझे नळ कनेक्शन घेतलयं पहिल्यांदा त्यांनी नळ कनेक्शन तोडुन खालच्या दुकानदाराने स्वत:जोडून घेतलयं किती दिवस वापरलं. माझ्या जेव्हा लक्षात आलं तेव्हा मी परतं नव्याने हे केलं नव्याने जोडले आणि आता परत त्याने तेच कनेक्शन तोडुन त्याच्या येथे घेतले. तरी त्याच्यावर काही कारवाई झाली नाही आणि आपले लोक तिथे दोन वेळा जावुन आपले लोक किंवा बाबा साळुंखेच्या कानावर घालुन सुध्दा कठलीही कारवाई होत नाही हे असं कसं चालेल.

**मा.सभापती :-** तुम्ही लेखी तक्रार दिली आहे का?

**श्रीमती. सरीता नेरकर :-** लेखी तक्रार नाही बाबा साळुंखेंना देते मी लेखी तक्रार बाबा साळुंखेंच्या कानावर घातले मी.

**मा.सभापती :-** लेखी तक्रार दिली पाहीजे त्याचा पाठपुरावा केला गेला पाहीजे आणि जर समजा त्याच्यावरही काही अंमलबजावणी होत नसेल तर आपल्याला त्यांच्यावर काय निर्णय घेता येईल तो घेता येईल सभेमध्ये

**श्रीमती. सरीता नेरकर :-** हो बरोबर ,

**मा.सभापती :-** तुम्ही लेखी तक्रार द्या

**श्रीमती. सरीता नेरकर :-** हो हो देते , तिथे हात लावण्याचा अधिकार नाहीये तो दोन दोन वेळा तो तोडतोय आपले लोकं तिथे जाताहेत तरी तिथे काही कारवाई होत नाही.

**मा.सभापती :-** आधी जो विषय चालु आहे तो पुर्ण करून घेवु आपण त्याच्यावर पण आपण बोलु

**श्रीमती. सरीता नेरकर :-** विषयाशी निगडीत विषय आहे माझा तो आपण जर याच विषयाशी संबंधित विषय आहे तो भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ सरीताताई जे म्हणताहेत ना की जेव्हा एखाद्या सन्मा.सदस्यांच्या बाबतीत प्रशासनातील कर्मचारी अशा पध्दतीने त्यांचे नळ तोडून दुसऱ्यांना जोडुन देत असतील तर ही बाब गंभीर आहे.कुठेतरी प्रशासनाने याबाबतीत कडक धोरण अवलंबले पाहीजे की अशा पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर तरी कारवाई करायला पाहिजे, ठिक आहे लेखी तक्रार त्या देतील त्याबद्दल काही वाद नाहीये.मौखिक सांगुनही आणि पुन्हा पुन्हा तो प्रकार घडत असेल तर हे योग्य नाही ना

**मा.सभापती :-** भाऊ बरोबर आहे आता नागरीकांनी ते नळ परस्पर जोडून घेतलेले आहे त्यांचे नळ कनेक्शन तोडून त्यांनी आपल्या लोकांनी नाही तर त्यांनी परस्पर घेतलेले आहे. जर त्यांची लेखी तक्रार जर आली मौखिक पण चालेल .

**श्रीमती. सरीता नेरकर :-** आम्ही त्यांना प्रत्यक्षात दाखवले ना राजुभाऊ स्पॉट वर दाखवलं आम्ही त्यांना भालेराव म्हणुन कर्मचारी स्वत: जावुन त्यांनी बंद केले स्वत: आपले कर्मचारी म्हणतात की ती पावती भरली आहे व ते नळ कनेक्शन त्यांनी हे केलय अस कस म्हणताहेत तुम्ही लेखी तक्रार देणारच ना

**मा.सभापती :-** ठिक आहे आपण सभा आटोपल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना बोलावुन त्यांना सुचना करू.

**श्रीमती. सरीता नेरकर :-** कारवाई झालीच पाहीजे माझे स्वत:चा व्येयक्तीक विषय आहे.

**मा.सभापती :-** बेंडाळेताई बोला

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो भाऊ

**मा.सभापती :-** सुचक म्हणुन आपल्याला मान्य आहे ना

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय , याच्यामध्ये नवनाथ भाऊंनी जी सुचना मांडली आहे त्याच्यावर काही उत्तर न देता तुम्ही निर्णय घेता आहे.

**मा.सभापती :-** प्रशासन त्याच्यावर योग्य ती कार्यवाही करेल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रशासनाला त्यांनी विचारल की संबंधित डिपार्टमेंटला / अधिकाऱ्यांना वारंवार आपण प्रत्येक मिटींग च्या वेळी सांगतो की मंजुर करा आता आपण मंजुर दराप्रमाणे मजुर आपण लावलेले आहेत. तर त्याच्यामधुनच आपण ही मजुर संख्या पुरविण्याला काय हरकत आहे किंवा आता एकचदा पुर्ण ठराव करून घ्या की मजुर संख्या आपल्या मंजुर दरामध्ये एकच टेंडर काढुन ते आपल्याला कुठल्याही कामावर किंवा कुठल्याही बेसवर वापरता येतील म्हणजे वारंवार आपल्याला प्रत्येक वेळेस सभेमध्ये ठराव करण्याची गरज पडणार नाही आणि वेळ लागणार नाही.आपण ते रिलीवर जे असतात त्यांच्यासारखे जर समजा व्हॅकेंट जर जागा झाली तर आपण त्याठिकाणी रिलीवर पाठवतात. त्याठिकाणी आपण एक मक्तेदाराला मक्ता नेमला पाहीजे.

**मा.आयुक्त :-** आपण महानगरपालिका

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपल्याला वारंवार पाणीपुरवठ्यासाठी , आरोग्यासाठी आता कोविड ची जी महामारी चालु आहे अशा ठिकाणी ज्या ठिकाणी आपल्याला बेसवर आपल्याला मक्तेदाराला माणस पुरविण्यासंदर्भात वेळोवेळी अडचणी येतात अशा वेळेस आपण जर एकच मक्ता जर दिला तर आपला वेळ वाया जाणार नाही आणि आपले काम वेळेवर होतील

**मा.आयुक्त :-** आपल्याला महानगरपालिकेला ज्या ज्या विभागांसाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता लागते त्यासाठी आपण हे टेंडर काढलेले आहे. आरोग्य विभागासाठी आपले टेंडर जे आहे पुढच्या ५ वर्षासाठी आहेच त्यासाठी आपण त्यांच्याकडुन ४०० कर्मचारी घेतो. जे काही कमी जास्त लागत असतील त्यासाठीची आपली एजन्सी आहे.कोरोनासाठी आपल्याला ज्यावेळी हे लागत होते त्यावेळेला आपण त्यासाठी वेगळे टेंडर काढलेले आहे. कोविड च्या ज्या ज्या उपाययोजनांसाठी आपल्याला कर्मचारी लागतील त्या त्या ठिकाणच एक टेंडर आपण दिलेले आहे.मला वाटत मागच्या दोन महिन्यापुर्वीच्या स्थायी समितीमध्ये आपण त्यांच्या खर्चालाही मंजुरी दिलेली आहे. त्याचे रितसर टेंडर काढुन आपण त्याची एजन्सी निश्चीत केलेली आहे. आता बांधकाम खात्यासाठी जे लेबर लागतात रोजचे ट्रॅक्टरवर त्याचीसुध्दा आपण टेंडर काढुन निश्चित केलेली आहे. त्यामुळे प्रामुख्याने बांधकाम , कोविड आणि आरोग्य या तिनही ठेक्यांसाठी आपले वार्षिक ठेकेदार आणि आपले त्याचे दर रितसर आपण मंजुर केलेले आहेत. आता हा जो विषय समोर आलेला आहे हा वर्ष अखेरला ज्यावेळेला घरपट्टी वसुलीची मोहीम आपण अधिक तीव्र करतो . अशा वेळेला आपण नळ कनेक्शन कट करतात. आता आपल्याकडे घरपट्टी कडे किंवा पाणीपुरवठा खात्याकडे नळ कनेक्शन कट करण्यासाठी कर्मचारी नाहीयेत . अर्थात नळ कनेक्शन वर होणारी कार्यवाही ही एका मर्यादीत कालावधीसाठी विशेष करून वर्षाच्या अखेरला ज्यावेळेला आपण सक्तीची वसुलीची कारवाई करतो त्यावेळेला आपण त्यावेळेला नळ बंद करणे किंवा जप्ती करणे अशा प्रकारची आपल्याला कारवाई करावी लागते . अशा वेळेला एका ठारावीक कालावधीसाठी आपल्याला कर्मचारी लागतात. जसे आता प्रभाग समिती १ ते ४ च्या प्रभाग अधिकाऱ्यांनी दिल्याप्रमाणे प्रत्येकाला ६ मजुर हे २६ दिवसांकरीता आवश्यक आहे.त्यामुळे लिमीटेड कालावधीसाठी आवश्यक असल्यामुळे जे आपल्याकडे दर आहे स्थायी समितीचे त्या दराप्रमाणे त्या ठेकेदाराकडुन घेण्याचा हा विषय आहे.मात्र जर आपल्याला मोठ्या प्रमाणात आणि दिर्घ कालावधीसाठी जर लेबर लागत असतील. तर जसे मा.उपमहापौर म्हणताहेत किंवा सन्मा.सदस्य दारकुंडे म्हणताहेत त्याप्रमाणे आपल्याला स्वतंत्र निविदेचा विचार करायला हरकत नाही. पण जर कमी मजुर कमी कालावधीसाठी लागत असतील तर त्याच्यासाठी वेगळी निविदा प्रक्रीया करण्याची आवश्यकता नसावी. मात्र दिर्घ कालावधीसाठी आणि मोठ्या प्रमाणावर जर मजुर लागत असतील. तर मात्र आपण निश्चित नव्याने निविदा प्रक्रीया करू.

**मा.सभापती :-** पुढचा विषय घेण्यात यावा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मा. आयुक्त महोदय,हॅलो मा. आयुक्त महोदय, आपल्याला माहिती आहे की नाही मला माहिती नाही परंतू आपल्याकडे बऱ्याच वर्षापासुन पाणी पुरवठा विभागामध्ये जे मजुर कार्यरत आहेत.

त्यांना आज रोजी आपण कुठलेही मानधन देत नाहीये किंवा त्यांना आपण आजपर्यंत सेवेत पण सामावुन घेतलेले नाहीये.असे पाच ते सात लोक पाणी पुरवठा विभागाला बरेच वर्षापासुन दैनंदिन कामे बऱ्याच वर्षापासुन आपल्या पाणी पुरवठा विभागामध्ये काम करत आहेत. काही ठिकाणी लिकेज असतील , व्हॉल्व फुटलेले असतील , काही ठिकाणी पाईपलाईन फुटलेली असेल. अशा वेळेस आपण त्या लोकांकडून काम करून घेतोय . जर तुम्ही म्हणताहेत की आपल्याला जर कायमस्वरूपी कर्मचारी लागणार असतील तर आपण पाणी पुरवठा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना जर विचारलं तर ते माहिती देतील ना की कीती लागतील म्हणजे आमचा म्हणायचा अर्थ इतकाच आहे साहेब की आपल्याला जसे तुम्ही जे म्हणताहेत की वारंवार ही प्रक्रीया जी आहे फार काळ चालणारी नाहीये.तर आपण शॉर्ट पिरिएड साठी काढतोय. परंतू साहेब आपण याचाही विचार केला पाहीजे आपण पाणी पुरवठा मध्ये जे लोक बिचारे वर्षानुवर्षापासुन काम करत आहेत. मग अशा लोकांना काय त्यांना मानधन देत नाहीयेत , सेवेत सामावुन घेत नाहीयेत कित्येक वर्षापासुन

**मा.सभापती :-** उपमहापौर महोदय,

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय मला ते माहिती नाहीये आपण पाणी पुरवठा विभागात असे कर्मचारी काम करीत आहेत की नाही हे विचारा तुम्ही पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना

**मा.सभापती :-** उपमहापौर महोदय, त्याच्यावरच बोलायचे आहे मला तुम्ही ते नळ कनेक्शन वगैरे जोडणारे ते बोललेत , परंतू आपले जे पाणी सोडणारे व्हॉल्वमन आहेत. यांना सुध्दा चार ते पाच लोक आहेत त्यांना सुध्दा मानधन सुध्दा नाहीये

**श्री.कुलभुषण पाटील :-** बरोबर आहे.खर आहे .

**मा.सभापती :-** आणि ते दहा दहा - बारा बारा वर्षापासुन काम करताहेत.विना मानधनाने काम करताहेत.

**सौ. ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** त्यांना कमीत कमी मानधन तरी सुरू झाले पाहीजे. त्यांना नका तुम्ही परमनंट करू आज रोजी परंतू त्यांना मानधन व त्यांच्या कामाचा मोबदला त्यांना मिळाला पाहीजे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय,

**श्री.कुलभुषण पाटील :-** कारण की , ज्योती ताई एक मिनिटं फक्त

**सौ. ज्योती चव्हाण :-** बर , बर

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय , आयुक्त साहेब आपण हे जे करताहेत ही चांगली गोष्ट आहे याच्याबद्दल वाद नाही . कामामध्ये आपले प्रशासन गतीमान व्हावे त्या दृष्टीने आपण काम करताहेत त्यादृष्टीने आपण कामाचे टेंडर देखील काढलेले आहे.परंतू वारंवार आपण आता ही जी संख्या आहे आपण घेतलेली आहे . १ ते ४ प्रभागामध्ये ही आपल्या मंजुर दरापैकीच घेतलेली आहे आणि हे जे आपण घेतोय हे मजुर लोक आहेत. पण मग मजुर या संज्ञेला आपण मागे सांगीतल्या प्रमाणे मजुर संज्ञेमध्ये आपल्याला कोविड साठी असो की साफसफाई साठी असो किंवा या आपण आता जे टेंडर काढले आहे . या आपल्याला मजुर म्हणुनच त्या संज्ञेमध्ये त्यांना काम द्यायचे असेल. तर मला तरी वाटते की आपण एका मक्तेदाराला याच्या अगोदर टेंडर दिलेले आहे. तर मग त्याच मक्तेदाराकडुन आपण त्या माणसांची रिक्वायरमेंट केली पाहीजे.नविन मक्ता काढण्याची गरज नको असली पाहीजे .आपण आता हे तर नॉन टेक्निशियलच लोक आहेत ना, अतांत्रिकच लोक आहेत ना, हे तर काय मजुर आहेत हे काही टेक्निकली नाहीत किंवा यांचा प्लंबिंगचा डिप्लोमा झाला असेल आणि तेच लोक आपल्याला लावायचे आहेत. मजुर म्हणुनच लावायचे आहेत तर आपण मागे त्याच्या संदर्भामध्ये मक्ते दिलेले आहेत. त्या मक्तेदाराला सांगुन आपण ते मजुर हायर केले पाहीजे असे मला वाटतं. जेणेकरून आपला या प्रक्रीयेमध्ये वेळ वाया जाणार नाही.

**सौ. ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय,

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता पाणी पुरवठामध्ये जे वर्षानुवर्ष पासुन जे बिचारे लोक मजुर म्हणुन काम करताहेत. त्यांना आपण कुठलेच मानधन देत नाहीये किंवा सेवेत सामावुन घेत नाहीये. अशा लोकांचा या दृष्टीने विचार झाला पाहीजे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय , दुसरे असे की

**सौ. ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय , दुसरे असे की ज्या वॉर्डामध्ये नळाच्या गळत्या आहेत. त्या संबंधी आपल्या काही हॅलो , हॅलो अध्यक्ष महोदय.

**मा.सभापती :-** भाऊ बोला आवाज येतोय बोला

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय , प्रभाग क्रं. १९ मध्ये जे जे रिटायर्डमेंट झालेले लोक आहेत. गळत्या काढणारे आहेत आपले लोक त्या ठिकाणी मजुर कमी आहेत. त्या गळत्या काढण्यासाठी सुध्दा आपल्याला मजुर लागतील भविष्यामध्ये लागतच आहे. कारण की आता पुष्कळ वर्ष झाले पुष्कळ गळत्या चालु आहेत. दोन ते तिन वर्षापासुन ड्रेनेज आणि अमृत मुळे गळत्या चालु आहेत. गळत्या का कमी होत नाहीये. एका वॉर्डात , एका प्रभागात कमीत कमी विस विस तिस तिस गळत्या आहेत. मजुर नाहीये मी तुम्हाला सुचवले तुम्ही सुचवल्या प्रमाणे विचार करावा या विषयावर

**मा.सभापती :-** भाऊ ठिक आहे संबंधित अधिकारी आपल्याला उत्तर देत आहेत.

**सौ. ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हो ताई बोला.

**श्री.नितीन बरडे :-** आयुक्त साहेब

**मा.सभापती :-** हो ताई बोला.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, साहेब आता कुलभुषण भाऊंनी जी सुचना मांडली तर माझ्या वॉर्डामध्ये कर्मचारी कित्येक वर्षापासुन काम करत आहेत.

**मा.सभापती :-** आहे ताई माझ्याकडे पण आलेले आहेत. चार पाच जे आपले व्हॉल्वमन आहेत ते माझ्याकडे येवुन गेले आहेत.

**सौ. ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय,ते कोणत्याही मोबदल्या विना काम करत आहेत.

**श्री.नितीन बरडे :-** राजुभाऊ

**सौ. ज्योती चव्हाण :-** तर त्यांना परमनंट ठेवा ही माझी तुम्हाला विनंती आहे आयुक्त साहेब आणि आता आपण जे कर्मचारी , मजुर घेत आहोत . त्यामध्ये जर यांना समाविष्ठ केले तर त्यांच्याही मानधनाचा प्रश्न सुटेल . अस मला वाटते तरी आपण या गोष्टीवर विचार करावा.सभापती महोदय

**मा.सभापती :-** नक्की ताई

**श्री.नितीन बरडे :-** राजुभाऊ , हॅलो

**मा.सभापती :-** हो बोला सन्मा.नितीनभाऊ ,

**श्री.नितीन बरडे :-** राजुभाऊ , हॅलो आयुक्त साहेब जे आता विना मानधन जे काम करत आहेत. त्यांचे तर दुर्देव आहे की ते काम करत आहेत. पण जे पगार घेवुन सह्या करून घरी जात आहेत त्यांचे काय.

**मा.सभापती :-** हो , एक मिनिटं

**श्री.नितीन बरडे :-** हॅलो

**श्री.सुशिल साळुंखे , उपअभियंता.पा.पु.विभाग :-** हे जे

**श्री.नितीन बरडे :-** हॅलो

**श्री.सुशिल साळुंखे , उपअभियंता.पा.पु.विभाग :-** पाणी पुरवठ्यात हे जे व्हॉल्वमन आहेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** बोला बोला , बाबा तुमचा आवाज येतोय बोला

**श्री.सुशिल साळुंखे , उपअभियंता.पा.पु.विभाग :-** पाणी पुरवठ्यात हे जे व्हॉल्वमन आहेत, त्यांना पुर्वी मक्तेदाराच्या मंजुर दरात त्यांना पैसे दिले जात होते. परंतू पाणी पुरवठ्याकडे मजुर लावण्याचा काहीच विषय नसल्यामुळे नंतर मानधन किंवा काहीच कुठलीही रक्कम अदा केलेली नाही असे माणस आहेत आपल्याकडे

**श्री.नितीन बरडे :-** साळुंखे साहेब मी आयुक्त साहेबांना प्रश्न करतोय पाणी पुरवठाच नाही . बांधकाम विभाग , आरोग्य विभाग , इतर विभाग जे बिगर मानधनाच काम करत आहेत त्यांच दुर्देव आहे की त्यांना पैसे भेटत नाहीयेत .पण ज्यांना ५०/५० , ६० /६० हजार पगार आहेत ते सह्या करून जाताहेत त्यांच काय?

**श्री.सुशिल साळुंखे , उपअभियंता.पा.पु.विभाग :-** पाणी पुरवठ्यातील कोणताही व्हाल्वमन काम करत नाहीये असे नाहीये. सगळे कामावर येतात आहे. त्यामुळे पाणी पुरवठा चालु आहे.

**श्री.नितीन बरडे :-** साळुंखे साहेब मी नुसता व्हॉल्वमनचा विषय नाही करत आहे.व्हॉल्वमनच आहेत का पाणी पुरवठ्यात फक्त

**श्री.सुशिल साळुंखे , उपअभियंता.पा.पु.विभाग :-** नाही आहेत ना दुसरे कर्मचारी पण आहेत.

**श्री.नितीन बरडे :-** साळुंखे साहेब मी आयुक्त साहेबांना प्रश्न करतोय , बांधकाम विभागात आहे, पाणी पुरवठ्यात आहेत इतर कर्मचारी , जे बिचारे फुकट काम करत आहेत त्यांचे तर दुर्देव आहे. त्यांना पेमेंट भेटत नाहीये. पण जे पेमेंट घेवुन फक्त सही करून जात आहेत त्यांच काय आहे?

**श्री.सुशिल साळुंखे , उपअभियंता.पा.पु.विभाग :-** असे आढळल्यास त्यांचा रिपोर्ट तयार करून कारवाई करणेसाठी फाईल पाठविण्यात येईल.

**श्री.नितीन बरडे :-** आढळल्यास म्हणजे सर्व युनिट ला माहिती आहे. कोण घरी जात आहे , काय करत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मा.सभापती महोदय, आता सन्मा.सदस्यांनी ज्या चर्चा केल्या त्या चर्चेच्या अनुषंगाने प्रत्येक विभागाची माहिती घेवुन प्रत्येक विभागामध्ये कुठल्या कुठल्या कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. कुठल्या कुठल्या विभागामध्ये मजुर लावण्याच्या संदर्भातील भुमिका ह्याचा प्रशासनाने परिपुर्ण प्रस्ताव तयार करावा आणि परिपुर्ण प्रस्ताव तयार करून खऱ्या अर्थाने बघितले तर मोठ्या प्रमाणावर कामगार नसल्याकारणाने आपली बरीचशी काम वेळे अभावी खोळंबतात.त्याच्यामुळे विकास कामांवरही त्याचा परिणाम जाणवतो. त्याअनुषंगाने नवनाथ भाऊंनी सांगितले, कुलभुषण भाऊंनी सांगीतले , नितीनभाऊंनी सांगीतले त्याच पध्दतीने प्रत्येक पाणी पुरवठा असेल , बांधकाम असेल की त्याच्यामध्ये किती कर्मचाऱ्यांची कमतरता आहे आणि त्याच पध्दतीने क. अभियंत्यांच्या बाबतीतही तीच तक्रार आहे.की आज आपण बघतोय की बरेचशे कर्मचारी सेवानिवृत्त होत चाललेले आहे आणि तसे बघितले तर मनपाचा कर्मचारी हा आस्थापना सुचिवर असलेला खुप कमी प्रमाणात उपलब्ध असल्याकारणाने त्याचा अतिरीक्त ताण इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर पडतो. तर त्या दृष्टीकोनातुन मानधनावर काही क.अभियंता घेण्याच्या संदर्भातील एक धोरण ठरवाव लागेल त्या दृष्टीने प्रशासनाने एक प्रस्ताव तयार करायला पाहीजे.

**मा.सभापती :-** भाऊ मजुरांचा जो विषय आहे त्यास कार्योत्तर मंजुरीचा विषय आहे नळ कनेक्शन बंद करायचा.

**श्री.नितीन बरडे :-** जी

**मा.सभापती :-** काम आपल्याकडे थांबत नाही प्रशासन एखादेवेळेस ते प्रस्ताव आपल्याकडे उशिरा येतात. परंतू मजुरांअभावी काम थांबलेले आहे असे काही मला आढळलेले नाहीये आणि नितीनभाऊंनी जो विषय केला. नक्कीच आपण नितीनभाऊ बरडे नक्कीच आपण त्याबाबत चौकशी करू . प्रत्येक प्रभाग समित्या असतील. प्रत्येक युनिट असतील.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, मजुरांमुळे शहरातील किती काम थांबलेले आहेत . हे तुम्ही आमच्या सोबत जर फिरले तर थोड आपल्या लक्षात येईल की मजुरांअभावी किती काम थांबलेले आहेत. आपले जे म्हणणे आहे की पण ते काही पटत नाहीये की मजुरांमुळे काही काम थांबलेले नाही म्हणुन आपल्या जळगांव शहरातील बरीच कामे जी आहेत ती विना मजुरांच्या आणि आपल्या यंत्रणेमुळे थांबलेले आहेत आणि मी ते आपल्या लक्षात पण आणुन द्यायला तयार आहे . आपण जर कधी माझ्या सोबत फिराल म्हणजे आपले म्हणणे जे आहे. त्याच्याशी मी सहमत नाहीये.

**मा.सभापती :-** नाही , भाऊ तुम्ही सांगा कुठे जायचे आहे आपण सोबत जावु भाऊ आपण पाहु , भेटी देवु

**श्री.कुलभुषण पाटील :-** एकदम सोप्या याच्यात सांगतो की.

**मा.सभापती :-** भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आमच्या सोबत शिवाजी नगरला चला

**मा.सभापती :-** भाऊ म्हणजे कार्यवाही होईल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** एकदम छोटे असे उदाहरण सांगतो . आयुक्त साहेबांच्या घरासमोरच इतका मोठा खड्डा आहे तो बऱ्याच महिन्यापासुन तो यंत्रणेअभावीच आणि आपल्या मजुरांच्या अभावीच तो बुजविण्याचा राहीलेला आहे आणि तो छोटसच आपल्या शहरातील आपल्या कमिशनर साहेबांच्या घरासमोरच उदाहरण तुम्हाला सांगीतले. असे शेकडो उदाहरणे आहेत की ते मी तुम्हाला लक्षात आणुन देवु शकतो. परंतु आपण जे सांगताहेत या गोष्टींचा आपण थोडा गांभीर्याने विचार केला. तर आपण सभापती आहेत आपल्याला जळगांव शहर वासीयांना आज रोजी सुखसुविधा उपलब्ध करून द्यायच्या आहेत. जर आपल्याला प्रशासन गतीमान करायचे असेल . तर आपणही आमच्या बरोबरीने काम करायच आहे.आम्ही तुम्हाला वाटत असेल की कुठल्याही पध्दतीचे राजकारण नाही होत आहे. आपण उगाच शहर वासीयांच्या विकासा संदर्भात चर्चा करतोय आपण आपल्याला प्रशासन गतीमान करून सर्व समस्यांवर उपाय कसे करता येतील. त्याबाबतीत आपण चर्चा करतोय राजुभाऊ

**मा.सभापती :-** आपल्याला राजकारण कराचेच नाहीये भाऊ राजकारणाचा विषयच नाहीये

**श्री.कुलभुषण पाटील :-** तुम्ही आमच्या खांद्याला खांदा मिळवुन काम केले पाहीजे असा आम्हाला विश्वास वाटत.

**मा.सभापती :-** नक्कीच नक्की शहराचा विकास करायचा आहे. सांगा केव्हाही बोलवा मी यायला तयार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ मान्य करण्यात यावा प्रस्ताव.

**मा.सभापती :-** फक्त सभापतीला टाळुन तुम्ही परस्पर करून घेवु नका.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही नाही सभापती महोदय आम्ही तुम्हाला टाळुन कधीच काम करणार नाहीये.

**मा.सभापती :-** मी बोललो नाही आज सकाळपासुन

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही नाही आम्ही फक्त एवढेच म्हणतोय की राजकारण न करता

**मा.सभापती :-** मी बोलणार नाही राजकारण करणार नाही आपल्याला विकास करायचा आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** बिलकुल बिलकुल भाऊ नक्की

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय,

**सौ. ज्योती चव्हाण :-** राजुभाऊ

**मा.सभापती :-** हो ताई

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, आमच्या कडुन काही चुका होत असतील ना तर आपण त्या निदर्शनास आणुन दिल्या ना त्या चुकांची पुनरावृती होणार नाही याची सुध्दा आम्ही काळजी घेवु.

**मा.सभापती :-** आपण ज्येष्ठ आहेत लहान्यांनी चुका लक्षात आणुन द्यायच्या नसतात

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही असे नाहीये , शेवटी बघा शहराच्या दृष्टीकोनातुन कामाचे नियोजन करतांना जर कधी चुकाही घडत असतील. परंतू झालेल्या चुका निदर्शनास आणल्या तर निश्चितपणे त्या टाळता येतील भविष्यात

**मा.सभापती :-** धन्यवाद

**सौ. ज्योती चव्हाण :-** कुलभुषणभाऊ प्रोटोकॉल पाळु म्हणा आम्ही तसा

**मा.सभापती :-** हा विषय मंजुर करायचा का?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो हो मंजुर करा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रोटोकॉल पाळु

**मा.सभापती :-** ठिक आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३२८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मार्च अखेर अंतर्गत वसुली मोहीम तीव्र करणेकामी मालमत्ता कराचा / पाणीपट्टी कराचा भरणा न करणाऱ्या मिळकतधारकांचे नळ संयोजन बंद करण्याची मोहीम प्रभाग कार्यालयामार्फत हाती घेण्यात आलेली आहे. तथापी पाणीपुरवठा विभागात कर्मचारी संख्या कमी असल्याने तसेच मुख्य जलवाहीनी फुटण्याचे व अमृतयोजने अंतर्गतची कामे त्यांचेकडेस असल्याने मजूर पुरवठा होत नाही.

करीता न्यु ज्वाला सेक्युरीटी फोर्स मक्तेदार जळगांव यांचे बांधकाम विभागा अंतर्गतची कामे करणेसाठी रक्कम रु.५४५/- मात्र प्रती मजूर प्रतीदिवस याप्रमाणेचे दरांस स्थायी समिती ठराव क्र.२८९, दि.२४/११/२०२० अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर कामी मंजूर दरात प्रती मजूर प्रतीदिवस रु.५४५/- याप्रमाणे प्रत्येक प्रभाग समिती मध्ये ६ मजूर याप्रमाणे चारही प्रभाग समितींसाठी २४ मजूर याप्रमाणे २६ दिवसांसाठी येणारा एकूण रक्कम रु.३,४०,०८०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**नगरसचिव :- विषय क्र. ४ :-** अतिक्रमण विभागाकडेस मनुष्यबळ कमी असल्याने आणि कोविड-१९ चा प्रार्दुभाव वाढत असल्याने गर्दी होणाऱ्या ठिकाणी कारवाई करण्यासाठी आरोग्य विभागाकडील कोविडसाठी घेण्यांत आलेल्या मंजुर दरांनुसार अतिक्रमण विभागाकरिता २० कर्मचारी दोन महिन्यांकरिता पुरवठा करणे व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मा.सभापती महोदय , आयुक्त साहेब असे विषय येतात आमचे म्हणणचे मुळात काय आहे की कुठलच काम हे थांबले नको पाहीजे प्रत्येक वेळा आपण प्रत्येक डिपार्टमेंट साठी वेगळा ठराव करायचा का? आमच नितीनभाऊ काय आहे की प्रशासनाचा या सगळया गोष्टीमध्ये वेळ जातो . ज्या कामांना आपल्याला सुरूवात करायची असते . त्या कामांना या अशा प्रक्रीयेमुळे वेळेत काम सुरू करू शकत नाही. तर ते काम अशा ठिकाणी पोहोचतात की ते करणे पण असह्य होत आणि लोकांची पण थोडी सहनशिलता संपलेली असते . प्रत्येक वेळेस हेच करत राहायचे . प्रत्येक वेळेस वेगवेगळया डिपार्टमेंटसाठी ही भरतीची प्रक्रीया करत राहायची. तरी आपण असा कुठला तरी एकच मक्तेदार की त्याला आपण एकच मक्ता दिला पाहीजे की मजुर या संज्ञाची व्याख्या मला मागे साहेबांनी सांगीतलेली आहे. या संज्ञेत कुठलीच व्याख्या नसते.

**मा.सभापती :-** भाऊ

**श्री.कुलभुषण पाटील :-** आता इतके मजुर आपण घेतले आहे

**मा.सभापती :-** भाऊ सभा , सभागृह त्याच्यासाठीच आहे मंजुरीसाठी केव्हाही प्रस्तावाला मंजुरी देणे आपली ती जबाबदारी आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय ऐका ना

**मा.सभापती :-** भाऊ ऐका ना कुठलाही प्रस्ताव आला .

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय आता मला सांगा प्रत्येक डिपार्टमेंटसाठी किती विषय आहे मला सांगा किती दिवसांपासुन चार महिने झाले ती वर्कऑर्डर किती सभा झाल्या. ज्या त्या कारणांमुळे आमच्या वॉर्डातील विकास कामे थांबलेले आहेत. काही काही विषय असे असतात.

**मा.सभापती :-** भाऊ ऐका ना आपल्या

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय ज्या विषयाची मंजुरी घेणे आपल्याला आवश्यक असते. परंतू आपण अश्या प्रत्येक छोटया विषयासाठी आपण असेच करत राहीले तर आपल्या विकास कामांना अडचण होते.आपली मिटींग होते मग आपण तेव्हा मग आपल्याला स्थायी समितीची सभेची वाट बघावी लागते . आमची ही विनंती आहे की या सगळया प्रक्रीयेला जो वेळ जातो .

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपले जे काम आहे ते वेळेत झाले पाहीजे आमचे इतकेच म्हणणे आहे.

**मा.सभापती :-** भाऊ सभा

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** दर आठवड्याला मिटींग झाली पाहीजे.

**मा.सभापती :-** भाऊ आपण सभा झाल्यानंतर ठरवु.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपल्या तत्कालीन सभापती शुचिताताई हाडा या प्रत्येक आठवड्यात मिटींग घेत होत्या. त्यावेळेस तुम्ही जर आले असते तर कदाचित हरकतही राहीली नसती .परंतू सभापती महोदय आपण चार चार महिन्यानंतर दोन दोन महिन्यांनंतर आपण सभापती महोदय आपण मिटींग घेत असाल आणि त्याच्या काही तांत्रिक अडचणींमुळे या गोष्टी थांबत असतील तर आपण ही प्रोसेस कधी करायची . या होणाऱ्या विलंबाला कोण कारणीभुत आहे.

**मा.सभापती :-** भाऊ आतापर्यंत सभागृहाने कुठलाही विषय थांबवलेला नाहीये.जसा विषय येतो तसा मंजुर होतो.

**श्री.कुलभुषण पाटील :-** अजेंड्यावरील विषय जर आपण बघत असाल तर

**मा.सभापती :-** लगेच आपण पाठवतो

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपल्या सदस्या आहेत उषाताई पाटील यांच्या वॉर्डातील बरेच काम आहेत ते बऱ्याच दिवसांपासुन थांबलेले आहेत.त्यांच्या वर्कऑर्डर प्रोसेस साठी गेल्या चार महिन्यापासुन आपण त्यांना वर्कऑर्डर देण्यासाठी स्थायी समितीच्या सभेसाठी आपण थांबलेलो आहे. मग त्या वॉर्डामध्ये जर डांबरीकरणाचे काम असतील तर येणाऱ्या पावसाळयात जर सुरू करायचे म्हंटले तर त्या कामांची काय क्वालीटी राहील. आता आपली ही सभा मागील महिना भरामध्ये जर झाली असती तर वर्कऑर्डर साठी कदाचित त्यांच्या वॉर्डामध्ये काम झालेले राहीले असते.

**मा.सभापती :-** आपल्याकडे प्रस्ताव आल्यानंतर लगेच आपण सभा काढतो.शेवटच्या क्षणाला सुध्दा अजेंडा काढण्यात येतो.

**श्री.कुलभुषण पाटील :-** राजुभाऊ या सर्व विषयांना चार महिने झाले . चार महिन्यांपासुन आता तुम्हाला माहिती आहे का यातील काही पैसे जर सभा झाली नसती तर लॅप्स झाले असते.

**मा.सभापती :-** डॉकेट

**श्री.कुलभुषण पाटील :-** राजुभाऊ आम्हाला विरोध नाही करायचा आहे. मुळात आमच म्हणणे आहे की या टेंडर प्रोसेसला प्रत्येक वेळेस आपण मंजुरी घेण्यापेक्षा आपण मंजुर दर जो आपला आहे तो फिक्स आहे. तर आपण एकच मक्ता काढायचा आपल्याला जर काम असेल. तर मक्तेदाराला काम द्यायचे काम नसेल तरी रिजर्व ठेवायचे आपल्याला त्याला पैसे थोडी द्यायचे आहे.

**मा.सभापती :-** भाऊ आपण आज म्हणतोय की एकच पुर्ण हे करायच. परंतू उद्याच्या दिवशी आपल्या समोर प्रस्ताव आला व आपणच प्रशासनावर ताशेरे ओढतो .त्याच्यासाठी आपल्यासमोर प्रस्ताव आला पाहीजे आपल्या समोरून गेला पाहीजे त्याला मंजुरी घेतली पाहीजे.त्याला आपण

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय ,त्याचा लेखा जोखा असतो की कोणत्या डिपार्टमेंटला किती मजुर लागले .आता कोविड साठी चालु आहे, आता आपल्या साफसफाई साठी देखील चालु आहे, सिक्युरिटी साठी चालु आहेत. त्या प्रत्येक विषयाची माहिती असते प्रशासनाकडे आपल्याला जेव्हा वाटेल आपण त्यांच्याकडुन मागुन घ्यायची. प्रशासन माहिती देत नेहमी

**मा.सभापती :-** आवश्यकते नुसार प्रशासन घेवुन टाकते . आता घेतलेलेच आहे ना

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** बोला ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय, याच्यामध्ये जे बांधकामचे जे रेट आहेत त्याचप्रमाणे आरोग्याचेपण रेट असणार आहेत का? याच्यामध्ये आकडा काही दिलेला नाहीये.

**मा.सभापती :-** दरामध्ये काही फरक आहे का साहेब बांधकाम आणि आरोग्याच्या दरामध्ये मजुरांच्या किमान वेतनासाठी

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** सन्मा.सभापती महोदय,सन्मा .सभागृह या विषयाच्या संदर्भात जे आपण दिपक उत्तराधी यांचे दर निश्चित केलेले होते. ते कोविडच्या संदर्भात ५२९ /- रूपये असे दर आलेले आहेत आणि त्या दरानुसारच आपण त्यांना जे काही मनुष्यबळ अतिक्रमण विभागस लागणार आहे.त्या दरानुसार मनपाच्या लेखा शिर्षातुनच निधी अदा करणार आहोत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हॅलो ५२९/- रूपये प्रति दर आहे का ?

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** हो ५२९ /- रूपये दर आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** बर मग याच्यात तसे दिलेलं नाहीये तस डॉकेटवर जेव्हा डॉकेट वगैरे निघत तेव्हा डॉकेटवर द्यायला पाहीजे ना मग

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** ओके मॅडम दक्षता घेवु आम्ही याच्यानंतर

**श्री.कुलभुषण पाटील :-** ताई त्याच्यामध्ये म्हंटलेले आहे मंजुर दरानुसार बहुतेक हो

**सौ.उज्वला बेंडाळे :-** म्हणजे बांधकाम मजुराला जो आहे तोच का कारण की बांधकाम मजुराला येथे ५४५/- रू.दिलेले आहे

**श्री.संतोष वाहुळे , मुलेप :-** सन्मा .सभागृह जी आपण कोविड साठी जी सेप्रेट निविदा काढलेली होती मनुष्यबळ पुरविण्या संदर्भामध्ये त्याचे दर आम्हाला प्राप्त झालेले होते ते ५२९/- आहेत आणि त्याच दरामध्ये आम्ही अतिक्रमण विभागासाठी जे मनुष्यबळ लागणार आहे ते आम्ही त्याच दरानुसार घेणार आहोत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ओके ठिक आहे.

**मा.सभापती :-** ताई ठराव मंजुर

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो मंजुर करण्यात यावा.

**श्री.अमित काळे :-** माझे अनुमोदन आहे सभापती साहेब

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३२९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव मनपा हद्दीत कोरोना साथरोगाचा प्रार्दुभाव जास्त प्रमाणात वाढत असल्याने शहरातील फेरीवाले हॉकर्स, भाजीपाला विक्रेते तसेच शहरातील मार्केट मधील गाळेधारक, खाजगी मार्केट मध्ये सोशल डिस्टसिंगचे पालन होणे, गर्दी न होवू देणे, व्यापारी, ग्राहक

तसेच नागरीक यांनी चेहऱ्यावर मास्क लावणे, साप्ताहीक बाजार बंद करणे कामी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापण यांनी सकाळी ७ ते संध्याकाळी ८ वाजेपावेतो व्यवसाय करण्याचे आदेश दिलेले आहे.

सदर आदेशाची अंमलबजावणी करणे कामी अतिक्रमण निर्मुलन विभागाकडे जास्त जबाबदारी दिलेली असुन या विभागात एकुण ५० कर्मचारी स्टॉफची आवश्यकता असते. सध्या अतिक्रमण विभागात १५ मजुर कर्मचारी असुन त्यांच्यावर कामाचा जास्त प्रमाणात ताण येत असल्याने व अतिक्रमण विभागास २० कर्मचाऱ्यांची तातडीची आवश्यकता असल्याने आरोग्य विभागाकडे कोविड-१९ प्रार्दुभाव रोखणेसाठी उपाययोजना करणेकामी नेमण्यात आलेल्या मे.दिपक उत्तराधी अमरावती यांचेकडून स्थायी समिती ठरावानुसार मान्य दराप्रमाणे दोन महीन्या करीता २० कर्मचारी अतिक्रमण विभागाकडेस पुरवठा करणेस व सदर कामी येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- काळे अमित पांडुरंग**

**नगरसचिव :- विषय क्र. ५ :-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वार्ड क्रं.०३ व १० मध्ये रस्ते डांबरी, कॉक्रीट गटार, आर.सी.सी. गटार तयार करणे कामास मक्तेदार वैष्णवी बिल्डकॉन जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दरास मान्यता मिळणे व सदर कामी येणारा रक्कम रु.५,०२,१७,४२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.अमित काळे :-** कुणाला काही बोलायचे आहे का कुलभुषणभाऊ

**श्री.कुलभुषण पाटील :-** मंजुर आहे , मंजुर आहे.

**श्री.अमित काळे :-** विषयाला मान्यता द्यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३३० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वार्ड क्रं.०३ व १० मध्ये रस्ते डांबरी, कॉक्रीट गटार, आर.सी.सी. गटार तयार करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नपा/नादवसुयो/आर.आर/४०५/२०२० दि.२१/१२/२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.०२/०२/२०२१ च्या मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्र.६०/०१ सन २०२०-२१ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सचुना मनपा पत्र क्र.सा.बा/८२६ दि.०८/०२/२०२१ चे पत्रान्वये दै.लोकमत या वर्तमान पत्रात दि.०९/०२/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/ प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे. तसेच सदर कामाची निविदा रक्कम रु.४,३९,२६,९७५/- अशी निविदा प्रसिध्द वेळेस टायपींग करताना नजरचुकीने प्रसिध्द करण्यात आली. परंतु सदरची रक्कम रु.४,३९,२५,९७५/- अशी शेडयुल बी ला देण्यात आलेली आहे. त्यामुळे निविदा रक्कम ही रु.४,३९,२५,९७५/- अशी आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.४,३९,२५,९७५/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | वैष्णवी बिल्डकॉन जळगाव | निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दराने | रु.४,३९,२५,९७५/- |
| २ | एल.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. | निविदा रक्कमेवर १७% जास्तीचे दराने | रु.५,१७,३२,७९८/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार वैष्णवी बिल्डकॉन जळगाव यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.४,३९,२५,९७५/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी.,कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ४,३९,२५,९७५/- |
| २ | जि.एस.टी.१२% | ५२,७१,११७/- |
| ३ | कामगार विमा ०.५०% | २,१९,६३०/- |
| ४ | टेस्टींग चार्जेस | १,०३,४००/- |
| ५ | रॉयल्टी चार्जेस | ६,९७,२९८/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ५,०२,१७,४२०/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.५,०२,१७,४२०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर रक्कमपैकी रक्कम रु.४,९९,९९,९९३/- मात्र हा नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत च्या निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.२,१७,४२७/- मात्र मनपा निधीतुन सन २०२२१-२२ चे लेखा शिर्ष नविन सस्ते या लेखाशिर्षातुन करणेस व मक्तेदार वैष्णवी बिल्डकॉन जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** १६ **प्रतिकुल मते :-** ००

**सुचक :- काळे अमित पांडुरंग**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**नगरसचिव :- विषय क्र. ६ :-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०६ व ११ मध्ये डांबरी रस्ते, कॉक्रीट रोड, आर.सी.सी. गटार तयार करणे कामास मक्तेदार एल.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दरास मान्यता मिळणे व सदर कामी येणारा रक्कम रु.२,७९,८५,०१८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.अमित काळे :-** विषय मंजुर आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आयुक्त साहेब हा विषय जो आहे दलीत वस्तीचा नाहीये दलीतेत्तर चा आहे तर प्रिंट मिस्टीक झाली असावी किंवा नजरचुकीने तो चुकला असावा तो दलीतेत्तर आहे, ६ नंबरचा विषय घ्यावा.

**श्री.नितीन लढ्ढा:-** तशी दुरूस्ती करून घ्यावी.आता विषय क्रं. ६ , ७ ,८ सगळे विषय अंक्षाकीत विषय आहेत आणि विषय क्रं. ९ हा संविदेंचाच आहे आणि मला वाटत सर्व विषयांना मान्यता देण्यास काही हरकत नाहीये.

**श्री.कुलभुषण पाटील :-** काही हरकत नाही भाऊ

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** धन्यवाद नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा:-** थॅंक्यु

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ दलीतवस्ती वॉर्ड नाही येत तो दलीतेत्तर आहे. तर प्रिंट मिस्टीक झाली असावी किंवा नजरचुकीने तो झाला असेल

**मा.सभापती :-** सन्मा.सदस्य अमितभाऊ

**श्री.अमित काळे :-** विषय मंजुर आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०६ व ११ मध्ये डांबरी रस्ते, कॉक्रीट रोड, आर.सी.सी. गटार तयार करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नप/नियोजन/आर.आर/२४९/२०२१ दि.२५/०१/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.०८/०२/२०२१ च्या मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्र.६१ सन २०२०-२१ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सचुना मनपा पत्र क्र.सा.बा/८५३ दि.१८/०२/२०२१ चे पत्रान्वये दै.लोकमत या वर्तमान पत्रात दि.१९/०२/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/ प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.२,४४,१४,४२५/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | एल.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन, जळगांव | निविदा रक्कमेवर ३.७७% जास्तीचे दराने | रु.२,५३,३४,८४९/- |
| २ | अभिषेक कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर ५% जास्तीचे दराने | रु.२,५६,३५,१४६/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार एल.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ३.७७% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.२,५३,३४,८४९/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी.,कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा समाविष्ठ करुन रक्कम रु.२,९०,२५,०९७/- मात्रचे दर जास्त आले सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीसाठी येवून सदरचे काम निविदा रक्कमेइतकेचेच दरात करण्याची लेखी संमती दिली आहे त्यानुसार सदर कामी रक्कम रु.२,४४,१४,४२५/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या जि.एस.टी.,कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | २,४४,१४,४२५/- |
| २ | जि.एस.टी.१२% | २९,२९,७३१/- |
| ३ | कामगार विमा १% | २,४४,१४४/- |
| ४ | टेस्टींग चार्जेस | ४७,४५०/- |
| ५ | रॉयल्टी चार्जेस | ३,४९,२६८/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | २,७९,८५,०१८/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. २,७९,८५,०१८/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर रक्कमपैकी रक्कम रु.२,७९,२३,२३७/- मात्र हा नागरी दलीतेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत च्या निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.६१,७८१/- मात्र मनपा निधीतुन करणेस व मक्तेदार एल.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- काळे अमित पांडुरंग**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**नगरसचिव :- विषय क्र. ७ :-** शहरातील नागरीकांच्या घराघरातुन घंटागाडीव्दारा व कचराकुंडयांवरील घनकचरा संकलन झालेल्या वाहनांचे जय महाराष्ट्र वजन काटयावर केलेले वाहनाचे वजनाचे देयक एकूण रक्कम रु.३,९६,१३०/- मात्र अदायगीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** त्याला मंजुर करा विषय क्रं. ७ ,८ आणि ९

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ सर्व संविदा आहेत विकास कामांच्या बाकी काही नाही तर मंजुर करायला काही हरकत नाही.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मंजुर करण्यात याव्यात.

**श्री.नितीन लढ्ढा:-** ताई सगळे विषय मंजुर करून घ्या ७,८ आणि ९ सगळेच संविदांचे आहेत आता

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो हो

**श्री.कुलभुषण पाटील :-** सगळे संविदांचे आहे आता

**मा.सभापती :-** मंजुर आहे का

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मंजुर करण्यात याव्यात.

**श्री.नितीन लढ्ढा:-** सभापती महोदय सगळे मंजुर सगळे ७ , ८ , ९ तिघेही विषय मंजुर करून घ्या.

**मा.सभापती :-** ठिक आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत घनकचरा अधिनियम २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी करणे करिता मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांना ५ वर्ष कालावधी करीता घंटागाडीव्दारे शहरातील वार्ड निहाय दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा कचरा, रस्त्यावरील कचरा तसेच उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उदयाने इ.सर्व ठिकाणचा घनकचरा (ओला व सुका) वेगवेगळा संकलन करून ट्रान्सफर कलेक्शन सेंटर पर्यंत वाहतूक करून सुका कचरा उतरविणे व ओला कचरा रिफ्युज कॉम्पॅक्टरमध्ये लोड करुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पापर्यंत वाहतूक करणे कामी टिपींग फी दर रु.९४९.५०/- प्रती मे. टन प्रमाणे दरमहा देयक अदा करणेस तसेच शहरातील वार्ड निहाय दैनंदिन रस्ते, गटार इ. साफ सफाई करणे करिता रु.५४३/- प्रती कामगार प्रमाणे पुरवठा करणे बाबत मक्ता देण्यात आलेला आहे.

करारनाम्यानुसार मनपा मालकीचे असलेले वाहने मक्तेदार यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. तसेच त्यांना घनकचऱ्याचे वजन करणेसाठी वजन काटा मनपाने पुरविणे आवश्यक होता. परंतु मनपा स्वत:चा वजन काटा खरेदी करुन लावणेपर्यंत खाजगी वजनकाटा मक्तेदारास उपलब्ध करून देणे ही मनपाची जबाबदारी होती. तेव्हा मनपाने दरपत्रक मागवुन घंटागाडी रु.३०/-, ट्रॅक्टर रु.४०/-, डंपर रु.४०/-, स्किपलोडर रु.४०/- आणि कॉम्पॅक्टर रु.८०/- प्रती ट्रीप प्रमाणे वजनाची फि ठरवुन वेळोवेळी प्रशासकिय मान्यता देण्यात आली होती.

कोविड-१९ विषाणुचे प्रादुर्भाव वाढल्याने लॉकडाऊन लागल्याने वजन काटे बसविण्यात व इलेक्ट्रीक कनेक्शन मिळण्यास उशिर लागणार असल्याचे कारणास्तव प्रकल्प विभागाने दिलेले अभिप्राय नुसार वजन काटे कार्यान्वीत होवु शकत नसल्याने कोटेशन व्दारा वेळोवेळी घनकचऱ्याचे खाजगी वजन काटयावर वजन करुन घेण्यात आलेले आहे. त्याच वजन काटयाचे वजनाचे आधारे प्रतीटन रु.९४९.५०/- या ठरलेले दराप्रमाणे वॉटरग्रेस प्रॉडक्टस् नाशिक यांचे देयक तयार करुन बील अदायगी झालेली आहे.

तरी घनकचरा भरलेले वाहनांचे खालील तारखेनुसार राहिलेले देयक आहे.

१) दि.१९/१०/२०१९ ते दि.११/११/२०१९ पर्यंत घनकचरा वजनाची फी रु.१,३३,९५०/-

२) दि.०८/०१/२०२० ते दि.०६/०३/२०२० पर्यंत घनकचरा वजनाची फी रु.१,६५,१५०/-

३) दि.२८/१०/२०२० ते दि.२५/११/२०२० पर्यंत घनकचरा वजनाची फी रु.९७,३००/-

एकुण - रु.३,९६,१३०

वरील तारखेनुसार घनकचऱ्याचे वाहनाचे वजन करुन घेतलेले आहे व सदर कामाचे घंटागाडी, ट्रॅक्टर, डंपर, स्कीपलोडर, कॉम्पॅक्टर व्दारा घनकचरा भरलेले वाहनांचे जय महाराष्ट्र तोल काटा, कांलिका माता मंदिर,जळगांव यांचेकड्न घनकचऱ्याचे वजन करण्यात आलेले आहे. व त्यांचे वजनाची फी ठरलेले दराप्रमाणे रक्कम देणे राहुन गेले आहे. राहिलेल्या वजन काटयाची फि एकुण रक्कम रु.३,९६,१३०/- देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) नुसार कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**नगरसचिव :- विषय क्र. ८ :-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१९ मधील मेहरुण सुप्रिम कॉलनी अंतर्गत पोलिस कॉलनी लगतच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामास मक्तेदार वैष्णवी बिल्डकॉन, जळगांव यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमे इतकेच दरास मान्यता मिळणेबाबत व येणाऱ्या रक्कम रु.१,९९,५६,३८३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.मुकुंदा सोनवणे:-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे .

**श्री.अमित काळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३३३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१९ मधील मेहरुण सुप्रिम कॉलनी अंतर्गत पोलीस कॉलनी लगतच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नप/नियोजन/आर.आर/२५२/२०२० दि.२५/०१/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.०९/०२/२०२१ च्या मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्र.६८/०७ सन २०२०-२१ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सचुना मनपा पत्र क्र.सा.बा/८९८ दि.०३/०३/२०२१ चे पत्रान्वये दै.लोकमत या वर्तमान पत्रात दि.०४/०३/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/ प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.१,७८,१७,६६३/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | एस कुमार कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर १५% जास्तीचे दराने | रु.२,०४,९०,३१२/- |
| २ | वैष्णवी बिल्डकॉन | निविदा रक्कमेवर ११% जास्तीचे दराने | रु.१,९७,७७,६०६/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार वैष्णवी बिल्डकॉन,जळगांव यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ११% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम

रु.१,९७,७७,६०६/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी.,कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा समाविष्ठ करुन रक्कम रु.२,२२,५०,४०७/- मात्रचे दर जास्त आले सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीसाठी येवून सदरचे काम निविदा रक्कमेइतकेचेच दरात करण्याची लेखी संमती दिली आहे त्यानुसार सदर कामी रक्कम रु.१,७८,१७,६६३/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या जि.एस.टी.,कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | १,७८,१७,६६३/- |
| २ | जि.एस.टी.१२% | २१,३८,१२०/- |
| ३ | टेस्टींग चार्जेस | ६००/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | १,९९,५६,३८३/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.१,९९,५६,३८३/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु.१,३९,६९,४६८/- मात्र महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गतच्या निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.५९,८६,९१५/- मात्र मनपा निधीतुन सन २०२१-२२ चे लेखा शिर्ष महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान मनपा हिस्सा या लेखाशिर्षातुन करणेस व मक्तेदार वैष्णवी बिल्डकॉन,जळगांव यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :-** १६ **प्रतिकुल मते :-** ००

**सुचक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**अनुमोदक :- काळे अमित पांडुरंग**

**नगरसचिव :- विषय क्र. ९ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय , मला फक्त एक दोन मिनिटांची सुचना मांडायची आहे. आयुक्त साहेब हॅलो , हॅलो , हॅलो सभापती महोदय , मला फक्त एक दोन मिनिटांची सुचना मांडायची आहे.

**मा.सभापती :-** बोला भाऊ बोला बोला

**श्री.कुलभुषण पाटील :-** तर आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की आपले जे सदस्य आहेत सभापती महोदय, आपले जे कर्मचारी आहेत जसे पोलिस कर्मचारी होते. समजा फ्रंटलाईनचे जे काही कर्मचारी होते. तर सर्वांच्या परिवाराला लसीकरण हे दिले गेले तशी आपल्याला विनंती आहे की आपण आदेशित करून आपले जे महानगरपालिकेचे कर्मचारी आहेत.आपले जे इंजिनियर्स आहेत किंवा जे आपले लोक पुढे येवुन काम करत आहेत.तर त्या कर्मचाऱ्यांच्या परिवाराला देखील प्रायोरिटीने लसीकरण देण्यासदंर्भा मध्ये आपण या ठिकाणी विचार करून त्या पध्दतीने आपले संबंधित वैद्यकीय अधिकारी असतील .अशा काही सुविधा किंवा जे काही लसीकरण सुविधा असतील किंवा लसीकरण चालु केलेले असतील. त्या ठिकाणी प्रायोरिटीने त्या ठिकाणी एक केंद्र रिजर्व ठेवुन आपल्या कर्मचाऱ्यांच्या परिवाराला अगोदर लसीकरण झालं पाहीजे कारण आपले जे काही कर्मचारी आहेत ते घरी गेल्यानंतर त्यांचे लसीकरण झालेले असेल किंवा काहींचे झालेले नसतील तर ते घरी जातात त्यांचे घरचे लोक म्हणजे कुटुबींयांना सदस्यांना कुठल्याही कोरोनाचा प्रादुर्भाव होवु नये . कारण ते लोक त्यांच्यापासुन त्यांना लागण होवु नये अशा कारणाने जर आपण त्यांच्या सदस्यांच्या जर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना जर लसीकरणाच्या बाबतीत जर विचार केला तर थोड बर होईल.

**श्री.नितीन लढ्ढा:-** योग्य सुचना आहे कुलभुषण भाऊ आपली

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, मी पण ही सुचना मांडणार होती, पण कुलभुषण भाऊंनी मांडली. त्या सुचनेचा आयुक्त साहेबांनी विचार करावा व वेगळया लसीकरणाची सोय किंवा कर्मचाऱ्यांसाठी व त्यांच्या परिवारासाठी एक सोय करावी ही माझी पण विनंती आहे आपल्याला

**मा.सभापती :-** नक्की केल जाईल मॅडम

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नगरसेवकांना पण देण्यात यावी व त्यांच्या परिवाराला पण

**सौ.उज्वला बेंडाळे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे .

**श्री.मुकुंदा सोनवणे:-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ३३४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./०८ दि.२०/०४/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०८ निमखेडी गट नं.१०१ मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ११% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१७,७९,९२०/- मात्र खर्चाची संविदा.

२.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१५ दि.२३/०४/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.०८ मध्ये निमखेडी गट नं.९० मध्ये परिसरात आर.सी.सी.गटार बनविणे कामी मक्तेदार श्री.नितीश कैलास कापडणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१३,२९,५५५/- मात्र खर्चाची संविदा.

३.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा/१६ दि.२३/०४/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.०८ निमखेडी गट नं.८६ मध्ये रस्ते सिमेंट कॉक्रिंट ट्रिमिक्स ने बनविणे कामी मक्तेदार श्री.राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १२.०६% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२३,३७,८१७/- मात्र खर्चाची संविदा.

४.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१७ दि.२३/०४/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.०८ मध्ये निमखेडी गट नं.८४ मध्ये रस्ते सिमेंट कॉक्रिंट ट्रिमिक्स ने बनविणे कामी मक्तेदार श्री.नितीश कैलास कापडणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२०,४३,७१०/- मात्र खर्चाची संविदा.

५.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१८ दि.२३/०४/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.०८ मध्ये निमखेडी शिवार गट नं.८३ मध्ये रस्ते सिमेंट कॉक्रिंट ट्रिमिक्स ने बनविणे कामी मक्तेदार श्री.नितीश कैलास कापडणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१४,३२,६९८/- मात्र खर्चाची संविदा.

६.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१९ दि.२३/०४/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.०८ मध्ये निमखेडी शिवार गट नं.९२/१,९२/२ मध्ये रस्ते सिमेंट कॉक्रिंट ट्रिमिक्स ने बनविणे कामी मक्तेदार श्री.नितीश कैलास कापडणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१९,८३,०५५/- मात्र खर्चाची संविदा.

७.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./२० दि.२३/०४/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मध्ये मेहरुण अंतर्गत गावठाण भागात मनपा मालकीच्या खुल्या जागेत समाज मंदिर बांधणे कामी मक्तेदार श्री.रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.१०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१९,८८,३७७/- मात्र खर्चाची संविदा.

८.प्रशासकीय आदेश क्र./आरोग्य/०१ दि.२६/०४/२०२१ अन्वये मनपा मालकीचे घंटागाडयांमध्ये ओला व सुका कचरा वेगवेगळा संकलन करणारे कप्पे दुरुस्ती कामी मनपाने ठरविलेल्या डिझाईनप्रमाणे लोखंडी सामान वापरुन ८५ घंटागाडयांचे मॉडिफिकेशन करणे प्रती घंटागाडी रु.१३,९००/- याप्रमाणे मक्तेदार कय्युम नवाज शेख जळगांव यांचे सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.११,८१,५००/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**